# राष्ट्रीय कृषि विकास योजना (शेतकरी प्रथम)
# विभागीय विस्तार केंद्र, कृ. म., कोल्हापूर
# यशोगाथा

**श्री.बाबासाहेब भिकाजी किल्लेदार**
**मु.कासारवाडा, पो.तुरंबे**
**ता.राधानगरी, जि. कोल्हापूर**
**व्यवसाय - शेती**
**मो.नं -९४२११२८४९००**



कृषी क्षेत्रासाठी नावलौकिक असलेला जिल्हा म्हणून कोल्हापूर जिल्ह्याला ओळखले जाते. या नावाजलेल्या जिल्ह्यातील दुर्गम अशा राधानगरी तालुक्यातील कासारवाडा हे माझे गाव, कोल्हापूर -राधानगरी रोडवर कोल्हापूरपासून ३५ कि.मी. अंतरावर वसलेले आहे. गावामध्ये शेती क्षेत्राची ओढ मोठ्या प्रमाणात आहे. गावातील बहुतेक लोकांचे उत्पन्नाचे साधन शेती हेच आहे. गावातील अनेक शेतकरी कृषी महाविद्यालय व कृषी विभाग यांच्याशी सतत संपर्कात आहेत. माझ्या गावातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायाबाबत शास्त्रीय ज्ञान कमी असल्याने शेती उत्पन्न कमी प्रमाणात मिळत होते. परंतु अनेक कृषी शास्त्रज्ञाच्या मार्गदर्शनाचा फायदा अलीकडे मोठ्या प्रमाणात आम्हाला होत आहे.

गावातील बहुतांशी शेतकरी मागील कित्येक वर्ष पारंपारिक पध्दतीनेच शेती करत होते. त्यामुळे अनेक तोटे होत होते याची आम्हा शेतकऱ्यांना कल्पनाही नव्हती. शेती क्षेत्रामध्ये नियोजनबध्द आखणी नसल्याने तसेच शेतीविषयी आम्हा शेतकऱ्यांना अपूरे ज्ञान असल्याने त्याचा फटका शेती उत्पन्नात बसत असे. कोणत्या हंगामात कोणती पिके घ्यावीत? खते किती व कधी टाकावीत? बियाणे कोणते वापरावे? बिजप्रकिया व पिकांवरील रोग-किड व्यवस्थापन कसे करावे? इ. या गोष्टींचे ज्ञान अजिबातच नव्हते. त्यामुळे उपजाऊ जमिन असूनही योग्य ते भरघोस उत्पन्न मिळत नसे. गावात भाजीपाला पिकाबाबत शेतकऱ्यांच्या मनात अपुलकी

नव्हती. मुख्य पीक ऊसासोबत मका हे आंतरपिक मोठ्या प्रमाणात घेतले जायचे. थोड्या प्रमाणातच शेतकरी भाजीपाला आंतरपिक म्हणून घ्यायचे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना ऊस पिकावरच्या उत्पन्नावर अवलंबून रहावे लागत असे.

एके दिवशी आमच्या कासारवाडा गावामध्ये शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाच्या माध्यमातून विभागीय विस्तार केंद्र, कृ. म., कोल्हापूर अंतर्गत शेतकऱ्यांना पीक नियोजनाबद्दल मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमामध्ये विस्तार कृषिविद्यावेत्ता डॉ. ए. ए. पिसाळ सर व प्रा. पाटगांवकर सर, प्रा. कदम सर, डॉ. करडे सर यांनी विविध विषयावरती मार्गदर्शन व प्रक्षेत्र भेटीवर आधारित कृषीसल्ला दिला. यामुळे शेतीकडे एक व्यवसाय म्हणून बघण्याचा माझ्यासह अनेक शेतकऱ्यांचा कल वळला. सुधारित तंत्रज्ञानाने शेती कशी करावी याबद्दल माहिती मिळाली. या कार्यक्रमामुळे विभागीय विस्तार केंद्र व शेतकरी वर्ग यांच्यात जवळीक निर्माण होवून गावामध्ये शेतकरी मंचाची स्थापना झाली. या मंचामार्फत शेतकऱ्यांना पुरेसे व योग्य शेती सल्ला व मार्गदर्शन मिळू लागले व गावातील शेतकरी वर्गाला याचा चांगला फायदा होवू लागला.

शेतकरी मंचाच्या एका कार्यक्रमात विभागीय विस्तार केंद्र, कृ. म., कोल्हापूरचे कृषिविद्यावेत्ता डॉ. ए. ए. पिसाळ सर, प्रा. यु. ए. कदम सर, डॉ. व्ही. एम. करडे सर यानी आम्हांला राष्ट्रीय कृषि विकास योजना (शेतकरी प्रथम) अंतर्गत पूर्व हंगामी ऊस + आंतरपिक भाजीपाला या योजनेबद्दल मार्गदर्शन केले. त्या मार्गदर्शनामुळे आम्ही गावातील २५ शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे ठरविले. त्यासाठी मी व इतर शेतकऱ्यांनी कांदा पिकाची निवड केली. वि. वि. के., कृ. म., कोल्हापूरच्या शास्त्रज्ञांमार्फत शेतकरी चर्चासत्र घेतले आणि त्यानुसार डॉ. ए. ए. पिसाळ यांनी कार्यक्रमाचा उद्देश व महत्व आम्हाला पटवून दिले. तसेच प्रा. कदम यांनी लागवड पध्दत व डॉ. करडे यांनी रोग - किडीबाबत मार्गदर्शन केले. याचा फायदा आम्हाला ऊस व आंतरपिक कांद्यासाठी चांगला झाला. राष्ट्रीय कृषि विकास योजना (शेतकरी प्रथम) अंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांचे एकदिवसीय प्रशिक्षण वि. वि. के., कृ. म., कोल्हापूर यांनी आयोजित केले होते. माझे एकुण ४० गुंठे क्षेत्र असून मी पूर्वहंगामामध्ये ऊसाच्या को-८६०३२ (निरा) या जातीची निवड केली. मी पूर्वी २.५ फुटाची सरी सोडत होतो. परंतु यावेळी शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनामुळे ३.५ फुटाची सरी सोडली आणि बेण्याची लागवड केली. तसेच सरीच्या बगलेत १७ सें.मी अंतरावर कांद्याच्या एन-२-४-१ जातीच्या ४५ दिवस वयाच्या रोपांची लागवड केली. यासाठी शास्त्रज्ञांनी लागवडीबाबत वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाचा फायदा झाला. लागवडीपासून ते काढणीपर्यंत वेळोवेळी शास्त्रज्ञ माझ्या

शेतीक्षेत्राला भेट द्यावयाचे. त्यामधुन आम्हा शेतकऱ्यांना योग्य कृषी सल्ला व योग्य ते मार्गदर्शन मिळायचे.

या क्षेत्रातून मी आधीसुध्दा सन २०१६ मध्ये ऊसात कांदा हे आंतरपिक घेतले होते परंतु मला त्यामधुन एकरी फक्त ६०० कि. ग्रॅ. इतकेच उत्पादन मिळाले होते, परंतु आत्ता याच क्षेत्रात कांद्याचे एकरी (४० गुंठ्यात) सुधारीत तंत्रज्ञानाने आंतरपिकाच्या रुपाने ८५० कि.ग्रॅ. उत्पादन मिळाले. तसेच या क्षेत्रातील ऊसाची वाढ ही चांगली झालेली होती आणि या हंगामात ४० गुंठयात मला ऊस ४५ टन झाला. याआधी ४० गुंठ्यात ४० टन इतका होत होता. या योजनेचा फायदा मला या उत्पादनाच्या फरकाने नक्कीच दिसून आला आहे. शिवाय कांद्याच्या रुपाने बोनस पिकही घेता आल्याने आर्थिक फायदा झाला.

भविष्यात मी माझ्या शेतीतून मी अधिकाअधिक उत्पन्न घेण्यासाठी प्रयत्नशील राहीन. याचे सर्व श्रेय मी वि. वि. के., कृ. म., कोल्हापूर व माझ्या कुटुंबाला देतो. त्यांच्यामुळेच पूर्व हंगामी ऊसात कोण-कोणती आंतरपिके घेता येतात याची माहिती झाली. वि. वि. के., कृ. म., कोल्हापूरकडून पुढील काळातही मला व इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळत रहावे अशी अपेक्षा करतो.

**धन्यवाद.**

# राष्ट्रीय कृषि विकास योजना (शेतकरी प्रथम)
# विभागीय विस्तार केंद्र, कृ. म., कोल्हापूर
# *यशोगाथा*

**श्री.अशोक शिवाजी कुम्मे**
**मु.कवठेगुलंद, ता.शिरोळ,**
**जि. कोल्हापूर**
**व्यवसाय – शेती,**
**शिक्षण – ९ वी,**
**मो.नं –९६५७३५६०५४**



कोल्हापूर जिल्हा राज्यात शेतीप्रधान जिल्हा म्हणून नावारुपाला आलेला एक जिल्हा आहे. याच शेतीप्रधान जिल्ह्यातील नैसर्गिक विविधतेने नटलेला तालुका म्हणजे शिरोळ तालुका आहे. याच तालुक्यातील कवठेगुंलद गावातील मी एक शेतकरी तसे पाहता आमच्या गावाला कृषी, सामाजिक, शैक्षणिक विषयामुळे गावातील लोकांच्या राहणीमानात विविधता आहे. गावाच्या लगतच कृष्णा ही जीवनदायी नदी वाहते. या नदीवर गावातील बरेच क्षेत्र सिंचनाखाली घेतले जाते. गावामध्ये विविध समाज राहत असल्याने सामाजिक बांधिलकी नांदत असते. त्यामुळे अनेक लोकांचे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन हे शेतीच आहे.

माझी कवठेगुलंद गावात एकुण २ एकर ३० गुंठे जमिन आहे. मी व माझे कुटुंब या जमिनीवरच उदरनिर्वाह करत असून यावरच आम्ही अवलंबून आहोत. गेली अनेक वर्ष मी या जमिनीमध्ये पारंपारिक पध्दतीने पिके घेत होतो परंतु सध्याच्या बदलत्या नैसर्गिक परिस्थितीमुळे जमिनीतून योग्य तो पाण्याचा निचरा न होता जमिनीमध्ये क्षारांचे प्रमाण वाढत आहे. शिरोळ तालुक्यातील अनेक जमिनी क्षारपड होवून नापीक होत आहेत. अनेक शेतकरी या समस्येला बळी पडत आहेत. माझ्या बरोबरच अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीच्यावर पांढऱ्या क्षाराचा थर आल्याने जमिनीचा पोत बिघडून जमिन पिकास अयोग्य बनत चालल्या असताना मला त्याबद्दल मनात खंत वाटायची. अशातच नैसर्गिक आपत्ती ही शेतकऱ्यांच्या मागे असतेच

यातून सावरणे शेतकरी वर्गाला शक्यच नसते परिणामी उत्पादनात दिवसें-दिवस घट होत होती हे प्रत्येक वर्षीच्या मिळणाऱ्या उत्पन्नातून जाणवत होते.

महात्मा फुले कृषि विद्यापिठाचे कोल्हापूर येथील विभागीय विस्तार केंद्र व श्री दत्त सह साखर कारखाना यांच्यामार्फत क्षारपड जमिनी सुधारण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमाला वि. वि.के मधील कृषीविद्यावेत्ता डॉ. ए. ए. पिसाळ सर व प्रा. यु. ए. कदम व डॉ. व्ही. एम. करडे यानी क्षारपड जमिनी सुधारणेसाठी आम्हा शेतकऱ्यांना मोल निचरा प्रणालीबाबत मार्गदर्शन केले. त्यातच श्री दत्त सह. साखर कारखान्याने क्षारपड जमिनी सुधारंणेसाठी सच्छिद्र पाईप योजना राबविणेसाठी प्रयत्न सुरु केले. त्यासाठी कारखान्यामार्फत शास्त्रज्ञाकडुन निवडलेल्या गावांचे सर्व्हे सुरु होते. याचवेळी वि. वि. केंद्राकडे राष्ट्रीय कृषी विकास योजना अंर्तगत क्षारपड जमिन सुधारणेसाठी मोल निचरा प्रणाली म्हणुन एक योजना आली. या योजनेविषयी माहिती डॉ. ए. ए. पिसाळ, प्रा. उत्तम कदम, कसबे डिग्रजचे इंजिनिअर डॉ. श्रीमंत राठोड, यानी श्री दत्त सह. साखर कारखान्याच्या कार्यक्रमात दिली. त्या माहितीच्याव्दारे आम्ही सुरुवातीला १०-१५ शेतकऱ्यांनी त्यांची भेट घेवून आमचे गाव या योजनेमध्ये घेण्याची विनंती केली.

राष्ट्रीय कृषी विकास योजना (शेतकरी प्रथम) ही योजना प्रात्यक्षिक स्वरुपात असल्याने मर्यादित शेतकऱ्यांची वि. वि. के., कोल्हापूर यांच्यामार्फत शेतकऱ्यांची निवड केली गेली आमच्या गावातील ३३ शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे ठरविले. त्यानुसार या योजनेअंर्तगत एकदिवसीय प्रशिक्षण ठेवून अनेक शास्त्रज्ञांनी मोल निचरा प्रणाली बद्दल योग्य ते मार्गदर्शन केले. त्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन आमच्या शेतात मोल नांगराव्दारे सन २०१७-१८ मध्ये जमिनीच्या उताराच्या दिशेने १२ मी अंतरावर भुमिगत मोलचर पाडण्यात आलेत या पाडलेल्या मोल पाईपच्या तोंडाला ४-६ फुट लांबीच्या पी.व्ही.सी. पाईप बसवल्या जेणेकरुन त्या मोलचे तोंड मातीने बुजू नये. त्यानंतर मी त्या क्षेत्रावर ३.५ फुटाची सरी सोडून त्यामध्ये ८६०३२ या ऊसाच्या जातीची लागवड करुन घेतली. त्यासाठी दोन रोपामधील अंतर २ फुट एवढे ठेवले. ज्यावेळी शेताला आम्ही पाणी देत असू त्यावेळी त्या पाईपामधून जादा झालेले व क्षारयुक्त पाणी बाहेर उताराच्या दिशेने जात होते हे दिसून आले.

अनेक शेतकरी वर्ग हा गरीब कुटुंबातील असल्याने प्रत्येकालाच सच्छिद्र पाईप योजना मोठ्या प्रमाणात खर्च करुन पाण्याचा निचरा करता येणे शक्य नाही. काही शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती तर खूप हलाखीची आहे. त्यामुळे राष्ट्रीय कृषी विकास योजना (शेतकरी प्रथम) अंर्तगत मोल निचरा प्रणाली पध्दत खूप चांगली व अत्यंत कमी खर्चाची (एकरी १४०० रुपये

फक्त) असल्याने दिसून आले.  या पध्दतीमध्ये मोलवाटे निचरा कालमर्यादा ही ३-४ वर्षे असल्याने ३-४ वर्षांनी परत मोल पाडावे लागतात. ज्या शेतकऱ्यांना शक्य असेल ते वाढीव उत्पन्नाचा फायदा घेऊन कालांतराने सछिद्र निचरा प्रणाली करु शकतात.

मी माझ्या शेतात मागील ३-४ वर्षाचे उत्पादन पाहता चालू सन २०१७-१८ चे पूर्व हंगामी ऊसाच्या उत्पादनात वाढ झाल्याचे मला आढळून आले. आधी मला ती क्षारपड जमिन असलेने एकरी २८ टन ऊस उत्पादन मिळत होते. परंतु मोल निचरा पध्दतीचा वापर केल्याने त्याच जमिनीतून मला ३९ टन एवढे उत्पादन मिळाले. त्यामुळे मला या पध्दतीचा फायदा झाला हे दिसून आले.

या योजनेअंर्तगत आम्हा शेतकऱ्यांना वेळोवेळी विभागीय विस्तार केंद्राच्या डॉ.अ.आ.पिसाळ व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी आम्हाला मदत केल्याबद्दल मी त्यांचा हार्दिक आभारी आहे.

# राष्ट्रीय कृषि विकास योजना (शेतकरी प्रथम)
# विभागीय विस्तार केंद्र, कृ. म., कोल्हापूर
# <u>यशोगाथा</u>



**श्री.रघुनाथ धोंडीराम बचाटे**
**मु.पो. बहिरेश्वर, ता.करवीर**
**जि.कोल्हापूर**
**शिक्षण – १० वी,**
**व्यवसाय – शेती**
**मो.नं – ९४२२५४५७५८**

कोल्हापूर पासून जवळच १५ कि.मी अंतरावर बहिरेश्वर हे माझ गाव भोगावती नदीच्या सान्निध्यात वसलेले आहे. सामाजिक, धार्मिक, ऐतहासिक व राजकिय पार्श्वभूमीसाठी प्रसिध्द असलेले माझे गाव विविधतेने नटलेले आहे. गावातील बहुतांशी कुटुंबे ही शेती व्यवसायावरच उदरनिर्वाह करतात. गावातील शेती व्यवसायाला लाभलेली भौगोलिक परिस्थिती ही आम्हाला ईश्वराने दिलेली एक देणगीच आहे. बराच शेतकरीवर्ग ऊस या नगदी पिकाबरोबरच कमी अधिक प्रमाणात भाजीपाला तृणधान्य, कडधान्य आणि तेलबिया पिकांची लागवड करतात. गावातील अनेक शेतकरी हे कमी शिकलेले असल्याने शेती क्षेत्रात काहीतरी करण्याची धडपड असतानाही कृषी नियोजनाच्या अज्ञानामुळे भरघोस उत्पादन घेण्यापासून वंचित रहातात.

आमच्या गावामध्ये विभागीय विस्तार केंद्र, कृषी महाविद्यालय, कोल्हापूर, ग्रामपंचायत, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत विविध पिकाबाबत अलीकडे अनेक कार्यक्रम होत आहेत. विभागीय विस्तार केंद्र, कृषी महाविद्यालय, कोल्हापूर यांच्यामार्फत सन २०१४-१५ मध्ये कृषीमंचची स्थापना करण्यात आली. या कृषी मंचाचा मी पण एक सदस्य आहे. या कृषी मंचामार्फत आम्हाला वि. वि. के. कृ. म., कोल्हापूरच्या डॉ.अ.आ.पिसाळ सर व त्यांच्या सहकारी प्राध्यापकांमार्फत कृषि मार्गदर्शन व सल्ला वेळोवेळी मिळत आहे. आमच्या गावामध्ये एके दिवशी विस्तार केंद्रामार्फत एका कार्यक्रमात राष्ट्रीय कृषी विकास योजनेतील पूर्व

हंगामी ऊस + आंतरपिक भाजीपाला या प्रात्यक्षिकाबाबत माहिती देण्यात आली. या योजनेचे महत्व, कार्यप्रणाली, उद्देश, कशी राबवयाचे याबदला शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. त्यानुसार गावातील १२ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली त्यातीलच मी एक शेतकरी आहे. त्या अंर्तगत आम्हा शेतकऱ्यांना वि. वि. के मार्फत एकदिवसीय प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये योजनेच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन केले.

पूर्वहंगामी ऊस + भाजीपाला या प्रात्यक्षिकासाठी मी माझ्या बहिरेश्वर येथील १ एकर जमिनीमध्ये प्रथम शेणखत टाकून उभी-आडवी नांगरट करुन घेतली. त्यानंतर कुळवणी करुन पूर्वमशागत करुन जमिन लागवडी योग्य केली त्यानंतर बटाट्याचे बीजप्रक्रिया केलेले ५0 ग्रॅम आकाराचे बेणे १ फुट अंतरावर ठेवून घेतले मधल्या जागेत रिजर चालविला त्यामुळे बटाटा बियाणे वरंब्यात आपोआप झाकले गेले व २.५ फुट पारंपारिक सरी पध्दतीला बगल देऊन कृषी शास्त्रज्ञांनी केलेल्या सल्ल्याने ४.0 फुट रुंदीची ऊस लागवडीसाठी सरी तयार करुन घेतली. सुरुवातीला मला व इतर शेतकऱ्यांना वाटायचे की अशा लागवड पध्दतीने बटाटे बियाणे खोलवर राहिल्याने उगवण चांगली होणार नाही. परंतु नंतर उगवण चांगली झाल्याचे मला दिसून आले. ऊस लागवडीसाठी प्रति एकरी खतमात्रा लागणीवेळी ३0 कि.ग्रॅ. युरिया, १२१ कि.ग्रॅ. सिं. सु.. फॉ, ५६कि.ग्रॅ. म्यु. ऑ. पो च्या मात्रा देवून घेतली. ऊस लागवडीसाठी ऊसाच्या को-८६0३२ (निरा) या जातीची निवड केली व एकरी ५५00 इतकी रोपे आणली. निरोगी व जोमदार रोपांची लागण २ फुटावर केली व शेताला सरीमध्ये पाणी दिले. अशा रितीने लागण केल्यानंतर ऊसाला व बटाट्याला शास्त्रज्ञांच्या सल्ल्याने उर्वरित खतमात्रा व पीक संरक्षण केले. त्यासाठी अनेक वेळा वि.वि.के.,कृ.मे. कोल्हापूरच्या शास्त्रज्ञांची माझ्या प्रक्षेत्राला भेट व्हायची याचा फायदा नक्कीच मला झाला.

सन २0१७-१८ मध्ये जेव्हा माझे १ एकर क्षेत्रातून उत्पन्न घेतले तेव्हा समजले की खरंच माझ्या उत्पादनात वाढ झाली आहे. मी याच जमिनीमध्ये मागील २-३ वर्षात ऊसाचे एकरे ५२ टन एवढे उत्पादन घेतले होते. तसेच बटाटा हे आंतरपिक घेतल्याने मला त्यापासून एकरी ३८.७ क्विंटल उत्पादन मिळाले. बटाट्यापासून मला इतर आर्थिक नफा मिळाला. त्यामुळे आंतरपिकांचे महत्व समजले. याकामी खुप कष्ट घ्यावे लागतातच असे नाही हेही समजून आले. तसेच मुख्य पिकाला लागणारा खर्च हा या आंतरपिकातून मिळणाऱ्या उत्पादनातून भागविता येतो याची जाणीव झाली.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेचा मी लाभ घेतला त्यामुळे मला आंतरपिकाचे महत्व नक्कीच समजले. माझ्या सारखे अनेक शेतकरी आहेत की ज्यांना आंतरपिक भाजीपाला बाबत

अज्ञान आहे. अशा शेतकऱ्यांना याबाबत माहिती मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना. तसेच विभागीय विस्तार केंद्र, कृ. म., कोल्हापूरच्या सहकार्याबद्दल त्या सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी वर्गाचा मी आभारी आहे. असेच सहकार्य त्यांच्याकडुन पुढे मला मिळो याबद्दल मी आशा बाळगतो.

**धन्यवाद.**

## ऊस + आंतरपिक प्रात्यक्षिक – कांदा




## ऊस + आंतरपिक प्रात्यक्षिक – कांदा



## ऊस + आंतरपिक प्रात्यक्षिक – बटाटा



## ऊस + आंतरपिक प्रात्यक्षिक – बटाटा



## क्षारपड जमिन सुधारणेसाठी मोल निचरा प्रणाली वापर




## क्षारपड जमिन सुधारणेसाठी मोल निचरा प्रणाली वापर

